॥ सबका मालिक आत्मा ॥



आत्मा (SOUL)

॥ हृदयामध्ये आत्म्यावरती प्रेम करण्याची कला म्हणजे ध्यान ॥

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

॥ ॐ गुरुदेव ॥

आत्मा मालिक

सप्टेंबर - २०२६



।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व–रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

।। आत्मा मालिक ।।

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २५ वे अंक ९ वा सप्टेंबर २०२६ ● RNI-MAHMAR/2001/4853

संस्थापक संपादक

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

संपादक

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

संपादकीय सल्लागार

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

मार्गदर्शक

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

आत्मा मालिक ध्यानपीठ

दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

धर्मशाळा (निवास व्यवस्था)

विलास गायकवाड,
मो. ९९२२१७४२११

संपादकीय - सत्संगाचे महत्त्व - संत परमानंद महाराज ४

अमृतानुभव दर्शन ३ - नामदेव सदावर्ते ७

आनंद - बंडोपंत कुलकर्णी १०

ऐसी कर्मगती ऐसा ध्यानी ज्ञानिया : भाग ८ - डॉ. सुनील शिंदे १४

परमात्मा भगवान श्रीकृष्ण व श्रीमद्भगवद्गीता - बी. के. गायकवाड २२

कृष्ण : एक सत्य भाव - नरेश यादव २८

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



संपादकीय

सत्संगाचे महत्त्व

संतत्व म्हणजे चित्ताची अशी अवस्था, जिथे 'मी'च्या मर्यादा हळूहळू विरघळू लागतात आणि अस्तित्वाकडे पाहण्याची दृष्टी व्यापक होते. ज्याच्या जीवनात करुणा आहे, ज्याच्या अंतःकरणात द्वेषाला आश्रय नाही, ज्याच्या आचरणात स्वार्थापेक्षा सत्य मोठे आहे, ज्याला स्वतःची प्रतिष्ठा जपण्यापेक्षा दुसऱ्याच्या कल्याणाची चिंता अधिक आहे आणि ज्याच्या सहवासात आपल्याला स्वतःच्या अंतरंगाकडे पाहण्याची प्रेरणा मिळते, तो संतत्वाच्या प्रकाशाशी जोडलेला आहे. म्हणून संतांची संगत म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या देहाचा सहवास नव्हे; त्यांच्या चेतनेतून प्रकटणाऱ्या सत्याचा स्वीकार होय.

-संत परमानंद महाराज

सत्संग' हा शब्द आपण अनेकदा सहजपणे वापरतो; पण त्याच्या अंतरंगात अत्यंत गहन तत्त्वज्ञान दडलेले आहे. 'सत्' म्हणजे जे शाश्वत आहे, जे परिवर्तनाच्या पलीकडे आहे; आणि 'संग' म्हणजे त्याच्याशी जोडले जाणे. म्हणून सत्संगाचा अर्थ केवळ संतांच्या सहवासात काही काळ बसणे एवढाच मर्यादित ठेवता येत नाही. सत्संग म्हणजे मनाची दिशा असत्यापासून सत्याकडे, क्षणभंगुरतेकडून शाश्वताकडे, बाह्यापासून अंतःस्थाकडे आणि अहंकारापासून आत्मबोधाकडे वळणे. एखाद्या संताच्या जवळ बसूनही मन जर विषयांच्या गर्दीत भटकत असेल, तर तो केवळ सहवास आहे; पण संत दूर असताना त्यांच्या एका वचनाने मनातील अहंकाराला धक्का बसला, अंतर्मुखतेची ज्योत प्रज्वलित झाली आणि स्वतःकडे पाहण्याची दृष्टी निर्माण झाली, तर तेथे खरा सत्संग घडतो.

भगवद्गीतेने मानवी मनाच्या या सूक्ष्म प्रवाहाचे विलक्षण मानसशास्त्र मांडले आहे-'ध्यायतो विषयान् पुंसः सङ्गस्तेषूपजायते । सङ्गात् संजायते कामः...' (२.६२). मनुष्य ज्या विषयांचे सतत चिंतन करतो, त्यांच्याशी त्याचा संग निर्माण होतो; संगातून कामना निर्माण होते आणि कामनेतून पुढे क्रोध, मोह, स्मृतिभ्रंश आणि बुद्धिनाशाची प्रक्रिया सुरू होते. मनुष्याचे चित्त ज्या गोष्टीशी वारंवार जोडले जाते, त्या गोष्टीचे संस्कार त्याच्या चेतनेवर उमटत जातात. आपण कोणत्या संगतीत राहतो, कोणते विचार ऐकतो, कोणत्या व्यक्तिमत्त्वांकडे आकर्षित होतो, कोणत्या गोष्टींचे चिंतन करतो आणि आपल्या अंतःकरणाला कोणत्या भावविश्वात वारंवार नेतो, यावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची अदृश्य रचना होत असते. म्हणूनच संगत ही बाह्य परिस्थिती नसून चित्ताच्या निर्मितीची एक शक्ती आहे.

वाईट संगती मनुष्याला अधःपाताकडे नेते, हे आपण सहज म्हणतो; पण चांगली संगत मनुष्याला उन्नत करते, या विधानाचा अर्थ त्याहून खोल आहे. सत्संग मनुष्याला केवळ चांगला मनुष्य बनवत नाही; तो त्याला 'चांगले' आणि 'वाईट' यांच्याही पलीकडे जाऊन सत्याचा शोध घेण्याची क्षमता देतो. कारण नैतिकता मनुष्याच्या आचरणाला दिशा देते, परंतु अध्यात्म त्याच्या अस्तित्वाच्या मुळाचा शोध घेते. संतसंगतीचा अंतिम हेतू माणसाला बाहेरून सदाचारी बनविणे नसून आतून जागृत करणे हा आहे.

संत म्हणजे असामान्य चमत्कार करणारा मनुष्य नव्हे. संतत्वाची खरी ओळख बाह्य वेशात,

प्रसिद्धीत, अनुयायांच्या संख्येत किंवा शब्दांच्या प्रभावात नसते. संतत्व म्हणजे चित्ताची अशी अवस्था, जिथे 'मी'च्या मर्यादा हळूहळू विरघळू लागतात आणि अस्तित्वाकडे पाहण्याची दृष्टी व्यापक होते. ज्याच्या जीवनात करुणा आहे, ज्याच्या अंतःकरणात द्वेषाला आश्रय नाही, ज्याच्या आचरणात स्वार्थापेक्षा सत्य मोठे आहे, ज्याला स्वतःची प्रतिष्ठा जपण्यापेक्षा दुसऱ्याच्या कल्याणाची चिंता अधिक आहे आणि ज्याच्या सहवासात आपल्याला स्वतःच्या अंतरंगाकडे पाहण्याची प्रेरणा मिळते, तो संतत्वाच्या प्रकाशाशी जोडलेला आहे. म्हणून संतांची संगत म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या देहाचा सहवास नव्हे; त्यांच्या चेतनेतून प्रकटणाऱ्या सत्याचा स्वीकार होय.

संतांच्या सान्निध्यात मनुष्याला सर्वप्रथम जे जाणवते ते म्हणजे स्वतःच्या मनाचे दर्शन. जगात आपण आरसे अनेक पाहतो; पण संत हा असा आरसा असतो की त्यात चेहरा नव्हे, तर चित्त दिसू लागते. आपल्या अहंकाराचे सूक्ष्म थर, मानाची भूक, अपेक्षांची पकड, मत्सराची सावली, भीतीची मुळे, असुरक्षिततेची धडपड-हे सारे पूर्वी इतरांमध्ये दिसत होते; संतांच्या सहवासात ते स्वतःमध्ये दिसू लागते. या दर्शनाला सामोरे जाण्याचे धैर्य ज्याच्यात निर्माण होते, त्याच्यासाठी सत्संग आत्मपरिवर्तनाची सुरुवात ठरतो.

संतसंगाचा हा परिणाम अत्यंत विलक्षण आहे. संत आपल्याला बदलण्याचा आग्रह धरत नाहीत; ते आपल्या दृष्टीला बदलतात. दृष्टी बदलली की जग बदलते. ज्या दुःखाला आपण शाप समजत होतो, त्यात आत्मपरीक्षणाची संधी दिसू लागते. ज्याला आपण शत्रू समजत होतो, तो आपल्या अहंकाराचा आरसा वाटू लागतो. ज्या यशाला आपण स्वतःची अंतिम सिद्धता मानत होतो, त्याची क्षणभंगुरता जाणवू लागते. आणि ज्याला आपण 'माझे' म्हणून घट्ट धरून बसलो होतो, त्याच्याविषयी मालकीपेक्षा कृतज्ञता निर्माण होऊ लागते. ही दृष्टीची क्रांती म्हणजेच संतसंगाचे खरे सामर्थ्य.

भागवत परंपरेत साधुसंगाला मुक्तीच्या मार्गातील अत्यंत महत्त्वाचे साधन मानले आहे. सत्संग कानांनी ऐकला जातो, पण त्याचे खरे कार्य हृदयावर होते. शब्द बाहेरून येतो; पण त्याचा संस्कार अंतःकरणात रुजतो. म्हणून संतवाणीचे सामर्थ्य माहिती देण्यात नसते; ती चित्ताची दिशा बदलण्यात असते.

ज्ञानेश्वर माऊलींच्या जीवनात आणि ज्ञानेश्वरीच्या आरंभी गुरुतत्त्वाला दिलेले स्थान याच सत्याची साक्ष देते. ज्ञानदेवांनी ज्ञानाच्या विशाल प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी सद्गुरू निवृत्तिनाथांना वंदन केले. हा केवळ परंपरेचा विधी नाही; त्यामागे ज्ञानाच्या स्वरूपाचे गूढ तत्त्वज्ञान आहे. बुद्धीला ज्ञान मिळू शकते, पण ज्ञानाचा अहंकार नष्ट करणारी दृष्टी सद्गुरूंच्या कृपेने जागृत होते.

तुकाराम महाराजांच्या अभंगवाङ्मयात संतसंगतीचे महत्त्व वारंवार प्रकटते. त्यांच्या दृष्टीने संतांची संगत ही भक्तीच्या जीवनाला प्राण देणारी शक्ती आहे. नामस्मरण, संतसंग आणि भगवंतावरील प्रेम यांचा त्यांच्या अनुभवात अभेद आहे. संतांची संगत लाभली की नामाची गोडी निर्माण होते; नामाची गोडी निर्माण झाली की मनाची विषयांवरील पकड सैल होऊ लागते; आणि मन अंतर्मुख झाले की भगवंताची अनुभूती बाह्य शोध न राहता अंतःकरणातील सत्याचा शोध बनते. त्यामुळे संतवाङ्मयातील सत्संग ही केवळ भक्तसमाजाची संकल्पना नाही; ती चित्तशुद्धीची प्रक्रिया आहे.

- संत परमानंद महाराज,

संपादक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



अमृतानुभव दर्शन ३

आपल्या संस्कृतीत स्त्री-पुरूष समानता तर आहेच, पण अध्यात्मात स्त्री-पुरुष एकरुपता मानतात. ज्ञानराजांनी प्रकृतीपुरुष समावेशनानंतर सद्‌गुरूस्तवन केले व नंतर तिन्ही वाचेतून निवृत्त होऊन सद्‌गुरू स्वरुपाचे वर्णन करतात. अधिकारसंपन्न अशा शिष्याला सद्‌गुरूंनी महावाक्याचा बोध केल्यावर शिष्याची देहात्मबुद्धीरुप निद्रा जाते व सच्चिदानंदरुप, शुद्ध, बुद्ध आत्मा मी आहे, अशी जागृती येते. देहबुद्धीची निद्रा गेली तरी आत्माहं या जागृतीरुपाने निद्रा येते.

- नामदेव सदावर्ते

संत ज्ञानेश्वरांचा अमृतानुभव हा ग्रंथ केवळ तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे. यात कर्मकांडाचा, व्रतनियमांचा, तीर्थाटन, उपासना आदिंचा पुरस्कार नाही. या ग्रंथात केवळ आत्मज्ञानातील रहस्यांचे प्रतिपादन आहे. हा सिद्धानुवाद आहे. गुरू शिष्यांचे हितगूज आहे. अमृतानुभव हा ग्रंथ अलौकिक व अपूर्व आहे. या ग्रंथाचे ग्रंथकार जीवकोटीतील नसून, ईशकोटीतील आहे. ज्ञानराजांच्या आरतीत म्हटल्याप्रमाणे सर्व जगतात आत्मज्ञानाचा लोप झाला, म्हणून ते आत्मज्ञान प्रकट करण्यासाठी ज्ञानेश्वर महारजांच्या रुपाने प्रत्यक्ष भगवान श्रीपांडुरंगच पुन्हा अवतरले. अशा वारकरी संप्रदायात दृढ श्रद्धा आहे.

लोपले ज्ञान जगी, हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग, नाव ठेविले ज्ञानी ।
प्रकट गुह्य बोले, विश्व ब्रह्मचि केले ।

ज्ञानराजांना महाविष्णूचा अवतार मानतात. गीता सांगणाराच ज्ञानेश्वरी सांगण्यासाठी अवतरला असावा. संत जनाबाई म्हणतात-

सदाशिवाचा अवतार, स्वामी निवृत्ती दातार ।।
महाविष्णूचा अवतार, सखा माझा ज्ञानेश्वर ।।
ब्रह्मा सोपान तो झाला, भक्ता आनंद वर्तला ।।
आदिशक्ती मुक्ताबाई, दासी जनी लागे पायी ।।

ज्ञानदेव प्रत्यक्ष भगवंतच होते. ते सिद्ध सद्‌गुरूंचे शिष्य होते. सद्‌गुरूंच्या आज्ञेनुसार त्यांनी आत्मज्ञानरहस्य प्रकट करण्यासाठी या ग्रंथाची निर्मिती केली आहे. या ग्रंथाची रचना मराठी भाषेत केली, हे मराठी माणसांचे सुदैव आहे. हा ज्ञानोबांचा महाराष्ट्रावर उपकार आहे. समर्थ वक्ता व समर्थ मराठी भाषा यांचा समन्वय येथे आहे. ग्रंथातील मर्म, अर्थ समजून घेऊन आनंद प्राप्त करून घेणे मराठी भाषा असलेल्या माणसांचे कर्तव्य आहे.

आपल्या संस्कृतीत स्त्री-पुरूष समानता तर आहेच, पण अध्यात्मात स्त्री-पुरुष एकरुपता मानतात. ज्ञानराजांनी प्रकृतीपुरुष समावेशनानंतर सद्‌गुरूस्तवन केले व नंतर तिन्ही वाचेतून निवृत्त होऊन सद्‌गुरू स्वरुपाचे वर्णन करतात. अधिकारसंपन्न अशा शिष्याला सद्‌गुरूंनी महावाक्याचा बोध

केल्यावर शिष्याची देहात्मबुद्धीरुप निद्रा जाते व सच्चिदानंदरुप, शुद्ध, बुद्ध आत्मा मी आहे, अशी जागृती येते. देहबुद्धीची निद्रा गेली तरी आत्माहं या जागृतीरुपाने निद्रा येते.

या निद्रेत महाकारण देहतादात्म्य येते. आत्म्याची पूर्ण जागृती ही निःशब्द व सहज असते. म्हणून ज्ञानराज म्हणतात-

हे शब्देविण संवादिजे । इंद्रिया नेणता भोगिजे ।
बोलाआधि झोंबिजे । प्रमेयांसी ।। १.५८।।

देहबुद्धी व आतमबुद्धीची निद्रा गेल्यावर आत्मज्ञानसंपन्न महात्मा आत्मस्वरुपी स्थिर व जागृत होतो. ही स्वरुपस्थिती शब्देविण संवाद करते. इंद्रिये नकळत आत्मस्वरुपस्थिती उपभोगतात.

तत्वमसि म्हणजे तत् त्वम असि. याचा मराठीत अर्थ असा आहे की, ते तू आहेस. ते ब्रह्म तूच आहेस. या अनुभवानंतर मी देह आहे, ही अविद्यानिद्रा जाते व शिष्याला सोहं रूप परमात्मस्वरुपाचा अनुभव येतो. भागवतात नाथ सांगतात-

अहं ब्रह्मास्मि ऐसी वाणी । एक वेळ पडता कानी ।
अविद्यानिद्रा गेली पळोनि । तत्क्षणी जगिन्नला ।।ए. भा. १०

बोधरूप आत्मा ज्ञान-अज्ञानातित असा ज्ञानरूप आहे. ज्ञानराज हरिपाठात सांगतात, जाणिव नेणिव भगवंती नाही. अज्ञानरूप अंधार ज्ञानरूप प्रकाशाने नाहिसा होतो. आत्मा हा नित्य ज्ञानरूप आहे. सच्चिदानंद रूप परमात्मा मी तोच आहे हे आत्मज्ञान सद्गुरू देतात. महावाक्यांच्या उपदेशाने आत्मज्ञान प्राप्त होते. त्यासाठी श्रीगुरूला शरण जाऊन ज्ञानात्मक परा, पश्यन्ति, मध्यमा, वैखरी या चारी वाणींचा निरस घडतो.

अज्ञानमूलक देहाहंकृतीचा नाश करण्यासाठी अहं ब्रह्मास्मि या ज्ञानवृत्तीचा आश्रय करावा लागतो. नंतर त्या ज्ञानवृत्तीचाही त्याग करावा. ज्ञान-अज्ञान दोन्हीही ईश्वरप्राप्तीसाठी बाधक असतात. मी ब्रह्म आहे हा ज्ञानाभिमान कठिण असतो. अज्ञानी देहाभिमानापेक्षा कठीण असतो. साधे मातीचे मडके पाण्यात विरघळून पटकन मातीस मिळते. पण, तेच मडके भाजलेले असेल, तर पाण्यात विरघळत नाही. पाण्यापासून मीठ तयार होते, पण ते पाण्यात विरघळण्यास उशिर लागत नाही. त्याच पाण्यापासून मोती तयार होतात, पण मोती पाण्यात विरघळत नाही. ईश्वराशी एकरूप होण्यासाठी अज्ञान व ज्ञान दोन्हीही बाधक ठरतात.

सद्गुरूजवळ सत्शिष्याने विचारपूर्वक महावाक्य श्रवण, मनन, निदिध्यासनादि अभ्यास केल्याने त्यास ज्ञानप्राप्ती घडते व त्या योगाने अविद्येची निवृत्ती होते.

कोणत्याही दुसऱ्या तेजाने निस्तेज न होणारा व कोणत्याही अंधःकाराने झाकला न जाणारा असा एक सूर्यच, ज्ञान अज्ञानधर्मशून्य व केवळ ज्ञानमात्र अशा ब्रह्मवस्तूस शोभेल. भावार्थ असा की, आपण अंधाराच्या परिहारार्थ अनेक दिवे लावले व त्यात एकच विजेचा मोठा दिवा लावला, तर बाकीचे सर्व दिवे फिके पडतील. नंतर शेकडो विजेचे दिवे जरी लावले तरी ते सूर्यप्रकाशापुढे फिके पडतील. सूर्यच अंधार नाहिसा करतो. कोणत्याही वृत्ती ज्ञानाच्या प्रकाशाने ज्ञानमात्र स्वयंप्रकाश आत्मवस्तू निस्तेज होत नाही. अज्ञानरूप अंधाराने केवळ ज्ञानरूप स्वयंप्रकाश ब्रह्मवस्तू झाकली जात नाही. आत्मज्ञानाच्या सूर्यप्रकाशापुढे अज्ञान विज्ञान निस्तेज होते.

परि ज्ञानमात्रे निरवळे । तेचि की तया कळे ।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

काई देखिजे बुबुळें । बुबुळा जेवी ।।४.१८

आपण ज्ञानमात्र आहोत, असे भान ब्रह्मस्वरुपी नाही. म्हणजे त्याचा त्याला ज्ञानीपणा दिसत नाही. डोळा सर्व वस्तूंना पाहतो, पण तो डोळा डोळ्यास पाहू शकत नाही. डोळ्याजवळ पाहण्याची शक्ती असूनही त्याला डोळा दिसत नाही. त्याप्रमाणे सच्चिदानंदरुप ज्ञानस्वरुप ब्रह्मरुपी स्वस्वरुपाचे भान नसते.

आकाशाच्या पोटात सर्व प्राणी संचार करतात. अग्नी सर्व जाळतो. स्वतःस जाळून घेऊ शकत नाही. कारण डोळा पाहणेस्वरुप, आकाश विशाल व अग्नी ज्वलनरूप आहे. आपण दुसऱ्याच्या डोक्यावर चढू शकतो, आपल्या मस्तकावर आपल्याला चढता येईल का?

आकाश आपणपया रिगे । काई आगी आपणया लागे ।

आपुला माथा वळघे । आपण कोणी ।।४.१९

ब्रह्माचे, आत्म्याचे, परमात्म्याचे, चिद्शक्तीचे असणे हे असून नसल्यासारखे आहे. असणे नसणे या धर्माला ते चिकटून राहत नाही. ब्रह्माचे सहज, शाश्वत असणे आहे. ज्ञानराज म्हणतात-

म्हणोनि काही नाही पण । देखता नाही आपण ।

नोहोनी असणेनवीन । असणे जे ।।

मातीच्या भूमीवर मातीचा कुंभ ठेवला म्हणजे भूमी कुंभसहित झाली. तो कुंभ भूमीवरून काढला की भूमी कुंभरहित झाली. असे म्हणणे चूक ठरते. कारण भूमी मातीची व कुंभही मातीचाच. मातीसहित माती व मातीरहित माती हे बोलणे निरर्थक ठरते.

अमृतानुभवाच्या पाचव्या प्रकरणात सत्-चित्-आनंद या तीन पदांचे विवरण केले आहे. असत् रूप जेथे नाही, ते सत्. जे जड नाही ते चिद्, चेतन. जे दुःखरुप नाही ते आनंदस्वरुप. सच्चिदानंद या शब्दातील तीन पद अध्यात्मज्ञानात केवळ सद्गुरूच समजावून सांगतात.

जे असत् नाही, जे जड नाही व जे दुःखरुप नाही तेच परमात्मस्वरुप आहे. जे पवित्र आहे, सचेतन आहे, तेजस्वी आहे व जे आनंदाचे निधीनिधान आहे, ते परमात्मस्वरुप आहे. जे ज्ञानसंपन्न, सद्गुणसंपन्न, स्फूर्तीदायी, आनंदघन असते, ते भगवंताचे मंगलमय रूप आहे. ब्रह्माचे सद्रूप, हेच चिदरूप व तेच आनंदरूप आहे. ब्रह्म सजातीय-विजातीय भेदशून्य आहे. ब्रह्मपदातील ही तीनही पदे एक आहेत. दुधात गोडी, द्रवत्व व पांढरा रंग वेगळे करता येत नाहीत.

तैसे सच्चिदानंद चोखटा । दाऊनि द्रष्टया द्रष्टा ।

तिन्ही पदें लागती वाटा । मौनाचिया ।।

सच्चिदानंद ही तिनही पदे द्रष्टा जो शुद्ध आत्मा, त्याचा द्रष्टभाव प्रकाशित करून मौन धारण करतात. म्हणजे, शब्दातित जो निर्विकल्प ब्रह्मभाव, त्या ठिकाणी ही तिन्ही पदे नाहिशी होतात व स्वरुपानुभव प्रकट होतो. असेच ज्ञानराज ज्ञानेश्वरीतही सांगतात.

जैसे न सांगणेवरी । बाळा पतीशी रुप करी ।

बोल निमालेपणे विवरी । अचर्चाते ।।१५.४६८

दोन तरुण मुली एके ठिकाणी बोलत बसल्या होत्या. त्यापैकी एकीचा पती आपल्या चार-पाच मित्रांसह पलिकडे बोलत बसला होता. दोन मुलींपैकी एकीला मैत्रिणीचा पती कोण आहे, हे माहित नव्हते. तिने आपल्या मैत्रिणीस त्या मुलांपैकी तुझा पती कोणता, असे विचारले. तर तिने नाही, असे स्पष्ट उत्तर

दिले. त्याप्रमाणे तिथे असलेल्या इतर मुलांकडे बोट दाखवून तसेच विचारले. तिने पुन्हा नाही असे उत्तर दिले. शेवटी एका मुलाकडे बोट दाखवून विचारले, हा तुझा पती आहे का, तेव्हा तिच्या मैत्रिणीने नाही असे उत्तर न देता फक्त लाजली व मान खाली घालून मौन राहिली. तिच्या या न बोलण्यानेच तिला विचारणाऱ्या दुसऱ्या मुलीची खात्री झाली की, तिचा पती हाच आहे. याप्रमाणे न बोलता तिने आपल्यापतीचे रूपज्ञान दिले. त्याप्रमाणे सच्चिदानंद हा शब्द नाहिसा होऊन त्याने नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, असंग, सर्वसाक्षी अशा आत्मस्वरुपाचा प्रत्यय करून दिला.

श्रुती नेति नेति, म्हणती गोविंदु रे।
जें जें बोलिजें तें तें नव्हे । होय ते तंव न बोलवें ।
साऊलिवरी न मववें । मवितें जैसे ।।५.२६

ब्रह्म सच्चिदानंद आहे. निर्गुण, निराकार असे जें जें म्हणावे, तें तें ब्रह्म नाही. जसे कोणी एक मनुष्य आपल्या स्वतःच्या उंचीचे प्रमाण काढण्यासाठी आपल्या सावलीची लांबी आपला हात टाकून मोजू लागला पण सावली पुढे पुढे जाऊ लागली. अशा प्रकारे सावली मोजणारा अयशस्वी ठरतो, थकतो. स्वतःची उंची मोजण्यासाठी स्वतःच्या सावलीचे माप स्वतःच घेऊ पाहणाऱ्यास जसे लज्जित व्हावे लागते, खोट्या सावलीच उंची मोजण्याने आपल्या खऱ्या उंचीचे माप कसे मिळणार?

तसे ब्रह्मस्वरुप शब्दाने व्यक्त करता येत नाही. कारण शब्दांच्या मापाने जे जे मोजले जाते, ते ते सर्व खोटे, मायिक असते. जेथे जेथे शब्द संपतो, तेथून ब्रह्मत्व सुरू होते. म्हणून संत सांगतात-

शब्द निमाला वाद खुंटला । त्रिभुवनी आनंदु जाला रे ।।

सच्चिदानंद या तीन पदांचे विवरण करून सच्चिदानंदाच्या पलिकडे असलेल्या आत्मवस्तूचे प्रकटीकरण शब्दच करू शकतात. शब्दामुळेच स्मरण घडते. शब्दाचे महत्त्व व सामर्थ्य ज्ञानराज सांगतात- स्मरण करून देणे हे शब्दाचे स्वभावकर्म आहे. आपल्या किंवा दुसऱ्याच्या हातून हरविलेल्या वस्तूंचे स्मरण शब्द करून देतो. अशी स्मारकपणाची कीर्ति जरी शब्द जगात मिरवित असला, तरी शब्दाचा इतकाच चांगलेपणा आहे.

अमूर्त जो जीवात्मा तो आपल्या आत्मस्वरुपाला विसरला आहे. त्याला स्वरुपस्थितीवर आणून आत्मदर्शन घडविणाऱ्या शब्दाचे जीवावर खूप उपकार आहेत. ज्ञानराज सांगतात-

बाप उपेगी वस्तू शब्द । जो स्मरणादानी प्रसिद्धु ।
अमूर्ताचा विशदू। आरिसा नव्हे ।।

- नामदेव सदावर्ते,
पसायदान बंगला, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक

***



आनंद

दुःख हे सुखाच्या विरुद्ध कार्य करते; परंतु आनंदाच्या विरुद्ध कार्य करणारी कोणतीही अवस्था नाही. सुख आणि दुःख या द्वंद्वात्मक अवस्था आहेत. सुख आले की पूर्वीचे दुःख जाणवते आणि दुःख आले की सुखाची आठवण होते. परंतु आनंद हा या दोन्हींच्या पलीकडील अनुभव आहे. आनंदाचा अनुभव घेण्यास सुरुवात झाल्यानंतर मनुष्य सच्चिदानंदाच्या दिशेने प्रवास करू लागतो.

- बंडोपंत दि. कुलकर्णी

आपण या संसारात वावरत असताना प्रत्यक्ष घटनेचा बोध घेण्याऐवजी अनुमानाने त्यातून सुख घेण्याचा वा उपभोगण्याचा अधिक प्रयत्न करीत असतो. मग प्रश्न असा निर्माण होतो की, सुख नेमके कशात आहे? घटनेत, कृतीत की अनुमानात? या प्रश्नाचा विचार केला असता मानवी जीवनातील अनेक प्रसंग आपल्याला त्याचे उत्तर देतात.

समजा, एखाद्या व्यक्तीने लॉटरीचे तिकीट घेतले. निकाल लागण्यापूर्वीच ती व्यक्ती ते तिकीट लागणार आहे, असा अनुमान करून भविष्याची रंगीत स्वप्ने पाहू लागते. नवीन घर, संपत्ती, मान-सन्मान, सुखसोयी यांचे चित्र ती मनात रंगवते आणि त्या कल्पनांमध्येच सुख अनुभवते. प्रत्यक्षात लॉटरी लागलेली नसते; पण अनुमानातून निर्माण झालेले सुख मात्र अनुभवले जात असते.

तसेच एखाद्या अविवाहित तरुणाच्या लग्नाचा विषय निघाला असता तो आपल्या होणाऱ्या पत्नीचे रूप, स्वभाव, संसार आणि भविष्य यांची कल्पना करून मनात एक स्वतंत्र जग निर्माण करतो. प्रत्यक्ष संसार सुरू झालेला नसतो; पण अनुमानातून तो त्याचा उपभोग घेत असतो. मुलाला नोकरी लागल्यानंतर वडील त्याच्या भविष्यातील प्रगती, प्रतिष्ठा आणि कुटुंबाच्या सुखाचे चित्र मनात उभे करून आनंदी होतात.

या सर्व प्रसंगांत मनुष्य अनुमानातून सुख घेत असतो आणि त्याच सुखाला आनंद समजत असतो. परंतु विचार केला असता लक्षात येते की या सर्व गोष्टी अनित्य आहेत. लॉटरी लागूही शकते आणि कदाचित लागू शकणारही नाही. कल्पना केलेला संसार प्रत्यक्षात तसाच घडेल याची खात्री नाही. नोकरी लागल्यानंतरही जीवनात अनेक चढ-उतार येऊ शकतात. त्यामुळे अनुमानातून निर्माण झालेले सुख हे क्षणभंगुर असते.

जे क्षणिक आहे ते सुख; आणि जे चिरकाल टिकणारे आहे तो आनंद.

याशिवाय प्रत्येकजण सहजपणे कोणत्याही सुखद प्रसंगात आनंद झाला, हा शब्द उच्चारतो. परंतु तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पाहिले असता आनंद ही चित्ताची सर्वोच्च अवस्था आहे. आनंद ही अशी अवस्था आहे की जिथे दुःखाला वाव राहत नाही. म्हणूनच 'आनंद' या शब्दाला खऱ्या अर्थाने विरुद्ध शब्द

नाही.

दुःख हे सुखाच्या विरुद्ध कार्य करते; परंतु आनंदाच्या विरुद्ध कार्य करणारी कोणतीही अवस्था नाही. सुख आणि दुःख या द्वंद्वात्मक अवस्था आहेत. सुख आले की पूर्वीचे दुःख जाणवते आणि दुःख आले की सुखाची आठवण होते. परंतु आनंद हा या दोन्हींच्या पलीकडील अनुभव आहे. आनंदाचा अनुभव घेण्यास सुरुवात झाल्यानंतर मनुष्य सच्चिदानंदाच्या दिशेने प्रवास करू लागतो.

ईश्वराला स्वतःची एक स्वतंत्र, शुद्ध अवस्था आहे. शुद्ध कधीही अशुद्ध होत नाही. परंतु अशुद्धाच्या सान्निध्यात शुद्ध आले असता ते अशुद्ध भासू शकते. उदाहरणार्थ, पाणी अशुद्ध झाले असेल तर त्यातून शुद्ध भाग वेगळा करता येतो; कारण मुळात त्यात शुद्धता अस्तित्वात असते. शुद्धता नसती तर ती वेगळी काढण्याचा प्रश्नच निर्माण झाला नसता. त्याचप्रमाणे मनुष्यामध्येही परमात्म्याचा अंश विद्यमान आहे. म्हणूनच त्याला सत्य, चैतन्य आणि आनंद यांचा अनुभव घेण्याची क्षमता प्राप्त झाली आहे. संत, ऋषी, महात्मे आणि ज्ञानी पुरुष यांनी आत्मसाक्षात्काराचा मार्ग दाखविला, तो याच कारणासाठी.

सत्, चित् आणि आनंद या संकल्पनांचा विचार केला असता असे दिसून येते की 'सत' म्हणजे अस्तित्व, 'चित' म्हणजे चैतन्य किंवा जाणीव आणि 'आनंद' म्हणजे त्या अस्तित्व व चैतन्याचा परिपूर्ण अनुभव.

असत् नष्ट झाल्यावर सत् प्रकट होते आणि अनित्याचा नाश झाल्यानंतर चित् किंवा नित्य अवस्था प्राप्त होते. याचा अर्थ सत् आणि चित् या अवस्थादेखील अद्याप प्रवासातील टप्पे आहेत; त्या अंतिम नाहीत. परंतु आनंद हा कोणाच्या आधारावर उभा नाही. आनंद स्वतःमध्येच पूर्ण आहे. तथापि, त्याची प्राप्ती सत् आणि चित् या अवस्थांतून प्रवास केल्यानंतरच होते. जसे एखाद्या प्रवाशाला पर्वताच्या शिखरावर पोहोचण्यासाठी विविध टप्पे पार करावे लागतात, तसेच साधकाला सत् आणि चित् या अवस्थांतून पुढे जाऊन आनंदाचा अनुभव घ्यावा लागतो.

आनंद समजावून सांगण्यासाठी उसाचे उदाहरण अत्यंत समर्पक आहे. उसामध्ये साखरेची गोडी असते; ही सत् अवस्था आहे. उसातील रसामध्ये साखरेची गोडी अधिक स्पष्टपणे अनुभवास येते; ही चित् अवस्था आहे. त्या रसापासून गूळ किंवा साखर तयार झाली की गोडवा प्रत्यक्ष अनुभवास येतो; ही आनंदाची अवस्था आहे. पुढे या सर्वांचा अतिक्रम करून जेव्हा साधक शुद्धाशी तद्रूप होतो, तेव्हा सच्चिदानंदाची अवस्था प्राप्त होते. जगद्गुरू संत तुकाराम महाराज म्हणतात-

आनंदाचे डोही आनंद तरंग ।

आनंदचि अंग आनंदाचे ।।

या अभंगातील तत्त्वज्ञान अत्यंत गूढ आहे. आनंदाच्या डोहात उठणारे तरंगदेखील आनंदाचेच असतात. जसे समुद्रातील लाटा समुद्रापासून वेगळ्या नसतात, तसेच आनंदातील सर्व अनुभव आनंदस्वरूपच असतात. त्या अवस्थेत द्वैत उरत नाही. शांत पाण्यात एखादा खडा टाकला असता त्यावर तरंग उठतात. आपण त्या तरंगांना स्वतंत्र अस्तित्व मानतो; परंतु ते पाण्यापासून वेगळे

नसतात. काही वेळाने ते विरून जातात आणि पुन्हा केवळ पाणी उरते.

त्याचप्रमाणे सुख-दुःख, इच्छा-अनिच्छा, लाभ-हानी, यश-अपयश हे सर्व मनाच्या पृष्ठभागावर निर्माण होणारे तरंग आहेत. त्यांच्या मुळाशी असलेले स्वरूप मात्र आनंदमय आहे.

ज्याप्रमाणे खड्ड्यात पाणी भरले असताना आपण त्याला पाण्याचा खड्डा म्हणतो, प्रत्यक्षात खड्डा तोच असतो आणि पाणी बाहेरून आलेले असते; त्याचप्रमाणे मनुष्याच्या चित्तात प्रकट होणाऱ्या विविध अवस्था तात्पुरत्या असतात. मूळ स्वरूप मात्र आनंदस्वरूप असते. मानवी जीवनातील सर्व धडपड ही आनंदासाठीच असते. कोणी धन कमावतो, कोणी विद्या प्राप्त करतो, कोणी सत्ता शोधतो, कोणी कीर्ती मिळवतो, तर कोणी कुटुंबाच्या सुखासाठी परिश्रम करतो. परंतु या सर्व प्रयत्नांचा अंतिम हेतू आनंद हाच असतो. दुर्दैवाने मनुष्य आनंदाचा शोध बाह्य वस्तूंमध्ये घेतो. म्हणून त्याला केवळ सुख मिळते; आनंद मिळत नाही.

धन मिळाले की काही काळ सुख मिळते; पण त्यासोबत चिंता वाढते. कीर्ती मिळाली की तिचे रक्षण करण्याची धडपड सुरू होते. शारीरिक सुख मिळाले की त्याच्या नाशाची भीती निर्माण होते. त्यामुळे बाह्य गोष्टींमधून मिळणारे सुख तात्पुरते ठरते. ते आनंद नसते. उपनिषदांनी म्हणूनच घोषित केले आहे की आनंद हा आत्मस्वरूप आहे. बाह्य वस्तूंमध्ये त्याचा शोध घेतल्यास तो मिळत नाही. जसा कस्तुरीमृग स्वतःच्या नाभीत असलेला सुगंध जंगलात शोधत फिरतो, तसा मनुष्य स्वतःच्या अंतरंगातील आनंद बाह्य जगात शोधत असतो.

सच्चिदानंद अवस्था प्राप्त झाल्यावर साधकाला शुद्धतेचे वेध लागतात. कारण शुद्धता ही आनंदावस्थेतच अधिक स्पष्ट दिसते. आनंद प्राप्त होत असताना सर्व उपाधी गळून पडू लागतात. अहंकार, ममता, आसक्ती, अपेक्षा आणि देहाभिमान यांची बंधने सैल होऊ लागतात. त्यामुळे चित्त निर्मळ बनते. जेव्हा चित्त पूर्णतः निर्मळ होते, तेव्हा त्याला आनंदाची परमोच्च अनुभूती प्राप्त होते. त्या वेळी जगातील सुख-दुःख, लाभ-हानी, मान-अपमान या गोष्टींचे महत्त्व कमी होते. साधकाचा दृष्टिकोन बदलतो. तो जगात राहूनही जगापासून अलिप्त होतो.

ईश्वर हा ब्रह्मांडात शुद्ध या सर्वोच्च अवस्थेत व्याप्त आहे. मनुष्य साधना करून त्या अवस्थेच्या समीप जाऊ शकतो. परंतु शुद्ध अवस्था ही साक्षात् परमेश्वरस्वरूप असल्यामुळे ती सर्वोच्च आहे. आनंदाची अवस्था महान असली तरी शुद्ध अवस्थेपेक्षा ती कनिष्ठ आहे.

म्हणूनच जगद्गुरू संत तुकाराम महाराज म्हणतात-

शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।।

परमेश्वर स्वतः शुद्ध आहे आणि आपण त्याची फळे आहोत. फळामध्ये बीजाचे गुण असतात; पण फळ म्हणजे बीज नव्हे. त्याचप्रमाणे मनुष्य परमेश्वरात सामावून राहू शकतो; परंतु परमेश्वराची पूर्णता मनुष्यदेहात सामावू शकत नाही. फरक इतकाच की मनुष्याच्या गुणांमध्ये उपाधी येते. कारण देह पंचमहाभूतांनी बनलेला आहे आणि परमेश्वर त्याही पलीकडे आहे. देह मर्यादित आहे; परमेश्वर अमर्यादित आहे. देह नश्वर आहे; परमेश्वर सनातन आहे.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

देहाच्या पलीकडे होऊन जे उपभोगता येते ते आनंद; आणि देहात राहून जे उपभोगले जाते ते सुख होय. देहाच्या पलीकडे दुःख नसल्यामुळे 'आनंद' या शब्दाला खरा विरुद्ध शब्द नाही. दुःख हे देह, मन आणि अहंकाराशी संबंधित आहे. जिथे यांचे अस्तित्व नाही, तिथे दुःखाचा प्रश्नच निर्माण होत नाही.

देहाच्या पलीकडे गेल्यानंतर देहाचे भान राहत नाही. तेथे अनुमानालाही थारा नसतो. कारण अनुमान हे मनाचे कार्य आहे आणि त्या अवस्थेत मन शांत झालेले असते.म्हणून आनंद हा कल्पनेचा विषय नसून अनुभवाचा विषय आहे.

संसारातील लहानसहान सुखांना आनंद समजण्याची चूक अनेकजण करतात. विषयभोग, संपत्ती, प्रतिष्ठा किंवा यश यांपासून मिळणाऱ्या सुखाला आनंद समजल्यामुळे मनुष्य ब्रह्मानंदापासून दूर जातो. म्हणून विवेकाने या दोन्हींचा भेद समजून घेणे आवश्यक आहे.

साधना, नामस्मरण, सत्संग, आत्मचिंतन आणि सद्गुरूंची कृपा यांच्या साहाय्याने मनुष्य या मार्गावर पुढे जाऊ शकतो. प्रत्येक अनुभवातून, प्रत्येक प्रसंगातून आणि प्रत्येक श्वासातून परमात्म्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, तर आनंदाची झलक अनुभवता येते.

जीवनाचे अंतिम उद्दिष्ट केवळ सुखसाधन नसून आत्मसाक्षात्कार आहे. परमोच्च अवस्था प्राप्त करून सच्चिदानंद अवस्थेत स्थिर होणे आणि त्या मार्गाने शुद्धात सामावून जाण्याचा प्रयत्न करणे, हेच जीवनाचे खरे सार्थक आहे. मानवजन्माची किमया याचमध्ये आहे. चला, आपणही सच्चिदानंदाचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करू या.

रामकृष्णहरी!

|| आत्मा मालिक श्रीकृष्णार्पणमस्तु ||

- बंडोपंत दि. कुलकर्णी

जिल्हा न्यायाधीश, पुणे

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



ऐसी कर्मगती ऐसा ध्यानी ज्ञानिया : भाग ८

गूढगम्य ज्ञान ज्ञानदेवा लाभले...

हरिनाम हे केवळ जपण्याचे साधन नसून अंतर्मनाला शुद्ध करणारे, जीवनाला दिशा देणारे आणि भक्ताला परमात्म्याशी जोडणारे साधन आहे. माऊलींच्या अभंगांतून नामाची हीच व्यापक शक्ती पुन्हा पुन्हा अधोरेखित होते. ज्ञान, ध्यान, नामस्मरण आणि भक्ती यांचा सुंदर संगम म्हणजे हरिपाठ. त्यातून साधकाला आत्मिक समाधान, अंतःशांती आणि मुक्तीचा मार्ग प्राप्त होतो.

-डॉ. सुनील शिंदे

माऊलींच्या हरिपाठाने ज्याप्रमाणे ज्ञान-ध्यान-नामपाठ दिला, त्याचप्रमाणे कर्मगतीच्या स्थितीतील भक्तांनाही वेगवेगळ्या परिमाणांसह विलक्षण प्रत्ययकारी दिलासा दिला आहे. गुरुकृपेने लाभलेल्या गूढगम्य ज्ञानाला माऊलींनी गौरविले आहे. गुरुकृपा असीम असल्याचे ते सांगतात. हरिपाठातील गोडवा, ज्ञान-ध्यान आणि कर्मगतीच्या माध्यमातून, विस्तारातून ज्ञानदेव महाराज साधार व्यक्त करतात.

जर सातत्याने हरिनाम मुखाने घेतले, तर त्याचे शरीर गायीप्रमाणे पावन होते. जो अखंड हरिनाम घेतो, तो कल्पांतापर्यंत वैकुंठात वास करतो. एवढेच नव्हे, तर घेतलेल्या नामामुळे त्याचे माता-पिता, बंधू आणि त्याच्याशी संबंधित सर्वजण चतुर्भुज विष्णुरूपाला प्राप्त होतात. निवृत्तिनाथांच्या असीम कृपेने हे गूढगम्य ज्ञान मला प्राप्त झाले, असा माऊलींचा विश्वास आहे. यासंदर्भात ज्ञानदेव म्हणतात-

हरिपाठ कीर्ती मुखे जरी गाय ।
पवित्रचि होय देह त्याचा ।।
तपाचे सामर्थ्य तपिन्नला अमुप ।
चिरंजीव कल्प वैकुंठी नांदे।।
मातृपितृ भ्राता सगोत्र अपार ।
चतुर्भुज नर होऊनि ठेले ।।
ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाभले ।
निवृत्तीनें दिले माझे हातीं ।।

हरिचे गुणवर्णन असलेले हरिवंशपुराण अभ्यासून जो कीर्तन करतो, त्याला हरिशिवाय काहीही आवडणार नाही. तसे झाल्याने त्या नराचे सर्व तीर्थभ्रमण घडून तो वैकुंठ प्राप्त करतो. पण मनाप्रमाणे आणि हट्टाग्रहाने वागणारा मनुष्य या लाभापासून वंचित राहतो. जो हरिनामात रमला, तोच मुक्त होतो.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

हरिनामाची जोडी घेऊन राहणाऱ्याला त्याची गोडी लागते आणि त्याला रामकृष्णनाम सतत प्राणप्रिय होते, ही माऊलींची स्पष्टोक्ती आहे. हरिगुणांचे मोल अर्थातच असाधारण आहे. हरिपाठात पंढरीनाथाच्या महिम्याचे वर्णन करताना माऊली पुढील दाखला देतात-

हरिवंशपुराण हरिनाम संकीर्तन ।
हरिविण सौजन्य नेणें काही।।
तया नरा लाधले वैकुंठ जोडले।
सकळही घडले तीर्थाटन।।
मनोमार्गे गेला तो तेथे मुकला।
हरिपाठी स्थिरावला तोचि धन्य।।
ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी।
रामकृष्णीं आवडी सर्वकाळ।।

ज्या वैष्णवाने हरिनामाची जोड धरली, त्याची अगणित जन्मांची पापे नष्ट होतील. एकदा उच्चारलेले हरिनाम हे अनंत जन्मांच्या तपासमान आहे. हरिनामामुळे सर्व मार्ग सुगम होतात. त्याच हरिनामामुळे योग, याग, क्रिया, धर्म-अधर्म यांचा विलय हरिपाठात होतो.

आपल्यासाठी फक्त हरिनाम हेच यज्ञ-याग आहेत आणि ते सोडून दुसरा कोणताही नित्यनेम नाही, अशी माऊलींची धारणा आहे. नामसंकीर्तनाला खऱ्या अर्थाने पर्याय नाही. हरिपाठ हीच सुगमता आहे. हरिनामाच्या नित्यनेमाची महती प्रकट करताना ज्ञानदेव म्हणतात-

नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी ।
पापे अनंत कोटी गेली त्याची ।।
अनंत जन्मांचे तप एक नाम ।
सर्व मार्ग सुगम हरिपाठ ।।
योग याग क्रिया धर्माधर्म माया ।
गेले ते विलया हरिपाठें ।।
ज्ञानदेवीं यज्ञ याग क्रिया धर्म ।
हरिविण नेम नाही दुजा ।।

एक हरिनामच साररूप आहे, हेच वेदशास्त्रांचे प्रमाण तसेच श्रुतीचे वचन आहे. जप, तप हे कर्ममार्ग आहेत. त्यामुळे त्यामध्ये वायफळ श्रम होतात आणि अखेर सगळे व्यर्थ ठरते. एक हरिनाम हाच खरा धर्म आहे.

भ्रमर जसा फुलामध्ये निवांत असतो, तसे हरिनाम करणारे निवांत राहतात. हरिनामाचा मंत्र म्हणून तेच शस्त्र केले, तर यम त्याच्याकडे फिरकत नाही, हा माऊलींचा विश्वास आहे. जप-नाम हे असाधारण गुणांचे आणि तोलामोलाचे आहे. याबाबतीत माऊलींचा विश्वास पाहा-

वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचे वचन।

एक नारायण सार जप ।।

जप तप कर्म हरिविण धर्म।

वाउगाचि श्रम व्यर्थ जाय।।

हरिपाठी गेलें तें निवांतचि ठेले।

भ्रमर गुंतले सुमनकळिके।।

ज्ञानदेवी मंत्र हरिनामाचे शस्त्र।

यम कुळगोत्र वर्जियेले।।

सुंदर आणि अप्रतिम प्रतिमा-प्रतीकांचा, विविध दाखल्यांचा उचित वापर करून संत ज्ञानदेव हरिनाम-नाममहात्म्याचे विश्लेषण करतात. गूढगम्य ज्ञान आणि ध्यानाची महती समर्पक भाष्य करून समजावून सांगतात.

हरिनाम हे केवळ जपण्याचे साधन नसून अंतर्मनाला शुद्ध करणारे, जीवनाला दिशा देणारे आणि भक्ताला परमात्म्याशी जोडणारे साधन आहे. माऊलींच्या अभंगांतून नामाची हीच व्यापक शक्ती पुन्हा पुन्हा अधोरेखित होते. ज्ञान, ध्यान, नामस्मरण आणि भक्ती यांचा सुंदर संगम म्हणजे हरिपाठ. त्यातून साधकाला आत्मिक समाधान, अंतःशांती आणि मुक्तीचा मार्ग प्राप्त होतो.

- डॉ. सुनील शिंदे

'तारांगण', महालक्ष्मी कॉलनी, अकोले, जि. नगर

('दत्त सुकृत', व्हॅलेंटिनो सोसायटी, अकोले, जि. नगर)

मोबा. नं. ९४२३०४५३४२

***



परमात्मा भगवान श्रीकृष्ण व श्रीमद्भगवद्गीता

परमात्म्याने सृष्टीचे रक्षण आणि दुर्जनांचे निर्दालन यासाठी वेळोवेळी सगुण अवतार धारण केले. भगवान विष्णूंनी आपला भक्त राजा अंबरीष याला दुर्वासा ऋषींच्या शापातून मुक्त ठेवण्यासाठी कालपरत्वे दशावतार धारण केले. त्यातील आठवा अवतार म्हणजे भगवान श्रीकृष्ण. साधारण पाच हजार वर्षांपूर्वीचा हा कालखंड द्वापारयुगातील आहे.

